ऑक्टोबर २००१

# ग्रामिण भागाचा कायापालट आणि सहकारी संस्था

ग्रामिण भागाचा कायापालट सहकारी संस्थाच करु शकतात असे नुकतेच आमच्या वाचनात आले. त्यावरुन आम्हाला वाटते की, आज जो काही गरीबी हा शब्द आहे त्याचा उल्लेख केला तरी मनात धडकी भरते. गरीबीचे हाल कसे असतात ते गरीबांनाच माहिती. त्यांना दोन वेळेचे जेवण सोडाच पण सावकारी कर्जामुळे झोप मिळणे मुश्कील झाले आहे. अनेक शेतकरी कर्जबाजारी होवून आत्महत्या करीत आहे. त्यांना यातून बाहेर काढायचे असेल तर ते काम फक्त सहकारी संस्थाच करु शकतात. कारण कर्जाचे व्याज कमी असल्याने व शेतीचे उत्पन्न निघाल्यानंतर कर्जफेड करायची असते, त्यासाठी त्याला बराच वेळ मिळतो. तशाच विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थाचा संबंध हा ७० टक्के जनता खेड्यात राहणाऱ्या शेतकऱ्यांशी असतो. त्यामुळे संस्थाचा उद्देश मुळी ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीशी व शेतीला पुरक असणाऱ्या उद्योगधंद्याशी संबंधीत असते. म्हणूनच शहरातील किंवा खेड्यातील युवा कार्यकर्त्यांनी व सहकारात पाऊल ठेवू इच्छिणाऱ्या युवा संचालकांनी शेतीला पुरक करणाऱ्या प्राथमिक सेवा संस्थाच्या कामकाजात प्रामाणिकपणे लक्ष घालून प्रगतीसाठी प्रयत्न करावा असे आम्हाला मनोमन वाटते.

सहकारचळवळ रुजविण्यात महाराष्ट्राची ही पुणीत भूमी एक प्रकारे सहकारी नेत्यांना घडविण्याची सोन्याची खान आहे.या सोन्याच्या खाणीत तरुणांनी सहकारात झोकून घेवून महाराष्ट्रचा ग्रामीण भाग सुजलाम सुफलाम केल्यास महाराष्ट्र व पर्यायाने सहकार चळवळ खुटणार नाही तर फोफावत जाईल असे आमची खात्री आहे. आमच्या मते ग्रामीण भागाचा कायापालट करावयाचा असेल तर खरोखरीच विविध कार्यकारी सहकारी प्राथमिक सेवा संस्था स्थापन केल्यास व त्याला युवा संचालकांनी प्राथमिक हातभार लावल्यास समृध्द ग्रामीण भाग पाहण्यास मिळेल. फक्त तरुणांनी मेहनतीने, जिद्दीने व तनमनधनाने यात उतरुन सहकार चळवळ वाढवावी, अशी आमची या युवा सहकारी नेत्यांना विनंती आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**